Towards Gender Equality

NARI SAMATA MANCH

# अभूतपूर्व परिस्थितीतले (लॉकडाऊन) कौटुंबिक नातेसंबंध



# लॉकडाउनमध्ये दहा टक्के महिलांचा अमानुष छळ

**नारी समता मंचाच्या सर्वेक्षणातील धक्कादायक वास्तव**


Aditya.Tanawade
@timesgroup.com
Tweet : @adityatanawade


पुणे : लॉकडाउनच्या काळात १० टक्के महिलांना थेट अमानुष छळाला, तर १४ टक्के महिलांना अप्रत्यक्षपणे कौटुंबिक हिंसाचाराला तोंड द्यावे लागले आहे.

यामध्ये पतीकडून मारहाण, शिवीगाळ, संशय घेणे, सतत टोमणे मारणे या प्रकारांचा समावेश आहे. स्त्रियांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या नारी समता मंचाने लॉकडाउनच्या काळात केलेल्या सर्वेक्षणात शहरात आणि ग्रामीण भागात कौटुंबिक हिंसा वाढल्याचा निष्कर्ष काढला आहे. हे सर्वेक्षण इंटरनेटद्वारे करण्यात आल्याने कौटुंबिक हिंसाचाराची मुळे शहरातही रुजल्याचे समोर आले आहे.

लॉकडाउनमध्ये संचारबंदी लागू असल्याने गेले दोन महिने पती-पत्नी आणि कुटुंब घरातच होते. अशा वेळी कुटुंबातील वातावरणावर नेमका काय परिणाम होतो, स्त्री-पुरुष नातेसंबंधांवर कसा परिणाम होतो याची उत्तरे शोधण्यासाठी नारी समता मंचने एक प्रश्नावली तयार केली. गुगल फॉर्मद्वारे घेण्यात आलेल्या या ऑनलाइन सर्वेक्षणात राज्यभरातील ५७२ महिला व ३२४ पुरुषांनी सहभाग घेऊन आपली मते मांडली यातील १० टक्के म्हणजेच सुमारे ६० महिलांनी त्यांना शिवीगाळ आणि मारहाण होत असल्याचे कबूल केले आहे. १४ टक्के महिलांनी मारहाणीच्या प्रश्नाला बगल देत थेट उत्तरे न देता अप्रत्यक्षपणे पुरुष हिंसा करीत असल्याचे सांगितले आहे. सर्वेक्षणात मत नोंदवलेल्या महिलांपैकी तीन टक्के म्हणजे सुमारे १५ महिलांनी त्यांचे पती सतत टोमणे मारणे, टोचून बोलणे, शिव्या देणे, इंटरनेट न वापरू देणे, संशय घेणे असे प्रकार करीत असल्याचे सांगितले आहे. कौटुंबिक हिंसाचाराचे हे प्रमाण पाहिले तर ते जास्त असून, लॉकडाउनमध्ये अनेक घरांमध्ये गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचा निष्कर्ष नारी समता मंचाच्या कार्यकर्त्यांनी काढला आहे.

कौटुंबिक हिंसाचाराबरोबरच घरातील कामाच्या विभागणीवरही या सर्वेक्षणात प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यामध्ये सर्वेक्षणात सहभागी झालेल्या महिलांपैकी ७० टक्के महिला कमावत्या आहेत. घर आणि नोकरी, व्यवसाय अशा दुहेरी भूमिका त्या पार पाडतात. सर्वेक्षणातील ५० टक्के महिल्यांच्या म्हणण्यानुसार टाळेबंदीच्या काळात स्वयंपाकघरातील चार ते पाच कामे त्यांचे जोडीदार करू लागले आहेत. (उदा. चहा/कॉफी सरबत बनवणे, ओटा साफ करणे, धुतलेली भांडी जागेवर ठेवणे, कुकर लावणे) २० टक्के स्त्रियांनी त्यांचे जोडीदार नाश्ता बनवणे, भाजी निवडणे, चिरणे, वाटण करून देणे, स्वयंपाक करणे, दूध तापवणे, दही लावण्यासारखी कामे करू लागल्याचे सांगितले.

सुमारे १५ पुरुषांनी स्वयंपाकघरात नेहमीच मदत करतो असे म्हटले आहे, तर १९८ पुरुषांनी स्वयंपाकघरात प्रथमच करू लागलेली कामे सांगितली आहेत. सतत घरात असल्याने पुरुषांनी या कामात काही प्रमाणात वाटा उचलल्याचे दिसत आहे.

**सर्वेक्षणातील महत्त्वाचे मुद्दे**

- ५७२ पैकी सुमारे ८० महिला हिंसाचाराच्या बळी
- ७० टक्के महिला उच्चशिक्षित असून, कमावत्या आहेत
- लॉकडाउनच्या काळात पुरुष घरातील कामे करतात असा ५० टक्के महिलांचा दावा
- घरातली आणि बाहेरची कामे करीत असल्याचा ६६ टक्के पुरुषांचा दावा
- २० टक्के पुरुष स्वयंपाक करतात, असे महिलांचे मत

**येत्या गुरुवारी वेबिनारचे आयोजन**

येत्या गुरुवारी १६ जुलैला नारी समता मंचतर्फे वेबिनार आयोजित करण्यात आले आहे. या वेबिनारमध्ये सर्वेक्षणातील निष्कर्षांवर चर्चा होणार असून, तज्ज्ञ मंडळी या वेळी मार्गदर्शन करणार आहेत. याशिवाय कौटुंबिक हिंसाचारासंदर्भात कोणतीही मदत अपेक्षित असल्यास नारी समता मंचाकडे संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

लॉकडाउनच्या काळात घरातील महिला आणि पुरुषांचे वास्तव्य वाढल्याने आम्ही स्त्री-पुरुष नातेसंबंधांविषयी सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला. त्यातील निष्कर्ष पाहिल्यानंतर अत्याचारांमध्ये वाढ झाली, ही वस्तुस्थिती आहे. याशिवाय इतरही काही पैलूंवर आम्ही प्रकाश टाकला असून, स्त्रिया आणि पुरुष यांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.
- प्रीती करमरकर, नारी समता मंच

मटा विशेष

# नारी समता मंचाचा ऑनलाईन सर्व्हे

१६ जुलै २०२०

# श्रेयनिर्देश

पुण्यात मार्चच्या (२०२०) मध्यावर लॉकडाऊन जाहीर झाला. सुरुवातीचे दहा-पंधरा दिवस नवीन परिस्थितीशी जुळवून घेण्यात गेले. त्यानंतर आम्ही कामाबाबत नियमित चर्चा सुरु ठेवल्या. Online meeting platforms मुळे खरेतर आधीपेक्षा जास्त चांगल्या चर्चा, संपर्क होऊ शकला कारण घरातूनच सहभागी व्हायचे असल्याने अनेक अडचणी दूर झाल्या. मंचाचे समुपदेशन फोनवर सुरु होतेच आणि इतर प्रकल्पांची कामेही घरुन सुरु होतीच. स्त्रियांवर वाढत्या हिंसेच्या बातम्यांमुळे या अभ्यासाच्या विचाराला चालना मिळाली. यासाठी प्रश्नावली तयार करण्याचे काम पूनम जुनगरे, जगदीश कसबे आणि प्राजक्ता उ. वि. या तिघांनी केले. त्याचे पूर्व परीक्षण, सुधारणा सूचना करणे हे काम सायली देशपांडे, क्षितिजा गोसावी आणि पल्लवी ढवळे यांनी केले. मंचाचे Ethics Committee सदस्य शामला वनारसे, रमा सरोदे, मिलिंद चव्हाण, संज्योत देशपांडे, अंजली मुळे यांनी मोलाच्या सूचना केल्या. Online survey च्या तांत्रिक बाबतीत तुषार टोणगावकर यांनी आपणहून मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष काम केले. या सर्व्हेची कल्पना, त्याची पद्धत, प्रश्नावली तयार करुन घेणे, Online forms तयार करणे, आलेल्या महितीचे विश्लेषण, मांडणी आणि अहवाल लेखन यामध्ये प्रीती करमरकर आणि विनीता बाळ यांचा मोठा वाटा आहे. या अभ्यासाची दखल महाराष्ट्र टाईम्सने घेतली त्याबद्दल त्यांचे आभार.

आज नारी समता मंचाच्या स्थापना दिवशी हा अहवाल सादर करण्यात आम्हाला फार आनंद वाटतो आहे.

**साधना दधिच**, अध्यक्ष – नारी समता मंच

१६ जुलै २०२०

## १. प्रस्तावना

कोविड १९ या अत्यंत वेगाने पसरणाऱ्या रोगाच्या जागतिक साथीमुळे जगभरच उलथापालथ झाली आहे. या रोगामुळे आरोग्यावर होणार परिणाम याविषयी पुष्कळ योग्य-अयोग्य लिहिलं, बोललं गेलं/जातं आहे. भारतात केवळ ४ तासांची पूर्वसूचना देऊन तीन आठवड्याचा लॉकडाऊन जाहीर करण्यात आला. त्याचे समाजावर, समाज व्यवस्थेवर, अर्थव्यवस्थेवर, माणसा-माणसातल्या नात्यांवर अनेक परिणाम झालेले आपल्याला दिसतात. हा लॉकडाऊनचा काळ पुढे वाढत गेला. नारी समता मंचाचे ऑफिस अचानक बंद करावे लागले त्यामुळे मदत मागणाऱ्या स्त्रियांचे सगळे फोनही (मोबाईलवर आलेले कॉल्स वगळता) आमच्यापर्यंत पोचू शकले नाहीत. मात्र लॉकडाऊनचे काही दुष्परिणाम कानावर पडू लागले होते.

या पार्श्वभूमीवर मंचाच्या कामाचा आवाका लक्षात घेऊन आम्ही पुरुषांसाठी आणि स्त्रियांसाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार करून लॉकडाऊनच्या परिणामांचा अंदाज घ्यायचा प्रयत्न केला. १२ मे पासून २४ मे पर्यंत गूगल फॉर्मच्या माध्यमातून आम्ही हा सर्व्हे केला. त्यात एकूण ५७२ स्त्रिया आणि ३२४ पुरुष सहभागी झाले. त्यातून जमा झालेल्या माहितीचे हे विश्लेषण. हा ऑनलाईन सर्व्हे असल्याने ज्यांना इंटरनेट सहज उपलब्ध असेल तेच लोक यात भाग घेण्याची शक्यता जास्त. उत्पन्नाचा आणि इंटरनेटच्या उपलब्धतेचा थेट संबंध गृहीत धरता येतो. त्यामुळे अगदी गरीब थरातल्या लोकांचा या सर्व्हेमध्ये सहभाग कमी असेल अशी आमची अटकळ होती आणि ती खरीही ठरली आहे.

आता लॉकडाऊन टप्प्याने-टप्प्याने शिथिल होत असला तरी या सर्व्हेच्या काळात अत्यावश्यक सेवा वगळता सर्व माणसे जवळजवळ चोवीस तास घरातच होती. कारखाने, उद्योगधंदे यांना लॉकडाऊनमुळे चांगलाच फटका बसला. त्यामुळे अनेकांना भविष्याबाबत चिंता ग्रासत असणे साहजिक आहे. वाढत्या कौटुंबिक हिंसाचाराच्या बातम्या आपण बघत होतो; पण त्याच्या बरोबरीने काही सकारात्मक गोष्टीही घडतांना दिसत होत्या जसे की कुटुंबियांनी कामे वाटून घेणे, बाईवर एकटीवर त्याचा भर पडू न देणे इत्यादि. ही स्थिती पाहता, या सक्तीच्या एकत्र असण्यामुळे असे होणारे परिणाम/बदल तपासण्यासाठी हा अभ्यास नारी समता मंचाने हाती घेतला.

## २. <u>सर्व्हेत सहभागी झालेल्या स्त्रीपुरुषांविषयी माहिती</u>

या ऑनलाईन सर्व्हेमध्ये गोपनीयतेच्या दृष्टीने नाव, गाव इ. माहिती आम्ही विचारली नव्हती. त्यामुळे उत्तरे देणाऱ्यात शहरी भागातले किती आणि ग्रामीण भागातले किती याचा आम्हाला अंदाज नाही. हा सर्व्हे १८ वर्षावरील स्त्री-पुरुषांसाठी खुला होता. मुख्य विषय हा २४ तास एकत्र राहण्यामुळे जाणवणारे/ अनुभवाला येणारे नात्यावरचे परिणाम/ बदल हा होता. नवरा-बायको किंवा लिव्ह-इन-नात्याने एकत्र राहणारे स्त्रीपुरुष यांच्यासाठीच प्रामुख्याने प्रश्नावली बेतली होती. एकट्या म्हणजे विभक्त झालेल्या, विधवा आणि अविवाहित स्त्रिया यांना घरात हिंसेला तोंड द्यावं लागतं का हेही विचारणारे प्रश्न सर्व्हेमध्ये होते. पण समलिंगी संबंधातली माणसं, ट्रान्सजेन्डर माणसं आणि त्यांचे विशिष्ट प्रश्न मात्र या सर्वेक्षणात विचारात घेतले नव्हते कारण त्या संदर्भात काम करण्याचा अनुभव आमच्याकडे नाही.

अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर दुष्परिणाम झाल्यामुळे नातेसंबंधावर काय परिणाम झाले याचाही अंदाज या परीक्षणात आला.

### २.१ <u>*भाग घेतलेल्या स्त्रियांविषयी माहिती*</u>

- प्रश्नावली भरणाऱ्या ५७२ स्त्रियापैकी विवाहित आणि लिव्ह-इन अशा एकूण ४९१ स्त्रियांनी ही प्रश्नावली पुरी केली. लिव्ह-इन नात्यातल्या स्त्री-पुरुषांची संख्या अपेक्षेनुसार फारच कमी (एकूण ६) होती आणि म्हणून या दोन्ही गटांचा यापुढे एकत्रच विचार केला आहे. ८१ एकल स्त्रियांनी प्रश्नावली पूर्ण केली.

| **वय** | |
|---|---|
| **वयोगट** | **स्त्रियांची संख्या** |
| १८-३० | ९८ |
| ३१-४० | १९३ |
| ४१-५० | १६६ |
| ५१-६० | ७८ |
| ६० पेक्षा जास्त | ३७ |
| **एकूण** | **५७२** |

- **आर्थिक गट** - दरमहा रु. १०,०००/- पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या गटापासून ते दरमहा रु. ५०,०००/- पेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या आर्थिक गटातल्या लोकांचा यात सहभाग आहे. पण त्यातही एक लक्षवेधी आकृतीबंध (pattern) दिसतो. ३० पेक्षा कमी वयाच्या स्त्रियांमध्ये ५५%

स्त्रिया दरमहा रु. २५,०००/- पेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या घरातल्या आहेत. वय वाढत जातं तसं ६० वर्षेपर्यंत या गटाचं प्रमाण वाढत जातं. ३१-४० वयोगटात ७०%, ४१-६० वयोगटात जवळजवळ ९०% असं प्रमाण दिसत. ६० हे निवृत्तीचं वय मानलं तर साठीपुढच्या स्त्रियांच्या घरात हे उत्पन्नाचं प्रमाण पुन्हा ७०% च्या आसपास येतं! यात आश्चर्य वाटण्याजोगं फार काही नसलं तरी भाग घेणाऱ्यांचं वर्गीकरण अगदीच विसंगत नाही एवढं यातून स्पष्ट दिसतं.

उत्तरदात्या स्त्रियांपैकी ७०% स्त्रिया नोकरी/व्यवसाय/निवृत्त या गटातल्या आहेत तर २६% पूर्णवेळ गृहिणी आहेत. म्हणजेच बहुतांश स्त्रिया पारंपारिक जबाबदारी सांभाळून आर्थिक कमाईही करत आहेत.

- **शिक्षण** - दहावी किंवा बारावी पर्यंतच शिक्षण झालेल्या स्त्रियांचे प्रमाण १० टक्क्याहून कमी आहे. तीस टक्क्याहून अधिक पदवीधर आहेत तर जवळजवळ ६०% स्त्रियांनी पदव्युत्तर शिक्षण घेतलं आहे. ही विभागणी बघता lockdown चे परिणाम कमी-शिक्षित आणि उच्च-शिक्षित गटात निराळे असतील का या प्रश्नाला आमच्या सर्वेक्षणातून उत्तर मिळत नाही.

- **एकल महिला –** एकूण ८१ एकट्या राहणाऱ्या स्त्रियांनी यात सहभाग घेतला. एकटया असलेल्या स्त्रियांपैकी २८ स्त्रिया या घटस्फोटित, विधवा किंवा नवऱ्यापासून स्वतंत्र रहात आहेत तर ५३ अविवाहित आहेत. वय वर्षे ३० पेक्षा मोठ्या असलेल्या २१ अविवाहित स्त्रिया यात सामील आहेत. लग्न न केलेल्या स्त्रियांचा हा आकडा उल्लेखनीय वाटतो. एखादा अपवाद सोडता तिशीच्या पुढल्या वयाच्या स्त्रिया किमान पदवीधर आहेत आणि आर्थिक स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या आहेत. घटस्फोटित, विधवा किंवा नवऱ्यापासून स्वतंत्र राहणाऱ्या गटातही नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण विवाहित स्त्रियांच्या तुलनेत अधिक आहे.  एकल स्त्रियांपैकी ६ स्त्रियांनी (८१ पैकी) लॉकडाऊनच्या काळात हिंसा वाढ झाल्याचे सांगितले आहे.

## २.२ *भाग घेतलेल्या पुरुषांविषयी माहिती*

एकूण ३२४ पुरुषांपैकी २९३ पुरुषांच्या उत्तरांचा यात विचार केला आहे. ते सगळे विवाहित (२८४) आणि लिव्ह इन (एकूण ९) या गटात मोडतात.

| वय | |
|---|---|
| **वयोगट** | **पुरुषांची संख्या** |
| १८-३० | ५२ |
| ३१-४० | ११५ |
| ४१-५० | ७९ |
| ५१-६० | ५४ |
| ६० पेक्षा जास्त | २४ |
| **एकूण** | **३२४** |

- **वयोगट** - या सर्वेक्षणामध्ये बत्तीस अविवाहित पुरुषांनी प्रश्नावली भरली. यातले बहुतेक १८-३० या वयोगटात मोडतात. केवळ चारच पुरुष ३१-४० या वयोगटातले आहेत तर चाळीशीच्या पुढला एकही पुरुष यात नाही. अविवाहित पुरुष आणि स्त्रिया यांच्या वयाच्या विभागणीमधला हा फरक समाजाचं प्रतिबिंब आहे असं आम्हाला वाटतं. शहरी भागात लग्न न करता एकट्या राहणाऱ्या स्त्रियांचं प्रमाण वाढतं आहे तर नोकरी लागल्या लागल्या दोनाचे चार हात करणं ही पुरुषांना सोईस्कर अशी पद्धत अजूनही नित्यनेमानं चालू आहे.

- **आर्थिक गट/वर्ग** - स्त्रियांच्या संदर्भात जो मासिक उत्पन्नाचा आकृतीबंध दिसतो जवळजवळ तोच पुरुषांच्या गटातही दिसतो. १८-३० या वयोगटात केवळ ४०% पुरुषांचं उत्पन्न रु. २५,०००/- पेक्षा अधिक आहे. हे प्रमाण ३१-४० वयोगटात ५५%, ४१-५० मध्ये आणि ५१-६० मध्ये ते ८०% आहे तर साठी नंतर ते ७५% वर येतं. फक्त या निरनिराळया वयोगटातल्या पुरुषांची संख्या स्त्रियांच्या तुलनेत कमी आहे.

    - २९३ पैकी १४६ पुरुषांची पत्नी/मैत्रीण कमावती आहे.
    - गंभीर बाब म्हणजे जवळ जवळ १०% पुरुषांनी सध्या बेकार असल्याचं नमूद केलं आहे.

- **शिक्षण** - साधारण १२% पुरुष हे दहावी किंवा बारावी पर्यंत शिकलेले आहेत. पन्नास टक्क्याहून अधिक पदव्युत्तर शिक्षण घेतलेले तर साधारण ३७% पदवीधर आहेत. पुरुष आणि स्त्रियांमध्ये यात फार फरक नाही.

- आश्चर्याची बाब अशी की एकाही लग्नानंतर एकट्या झालेल्या पुरुषांनी या सर्वेक्षणामध्ये भाग घेतला नाही.

## ३. आम्हाला काय दिसलं आणि काय नाही दिसलं !

नवरा आणि बायको अशा दोघांनी या सर्वेक्षणामध्ये भाग घेतला का हा प्रश्न विश्लेषण करण्याच्या दृष्टीने महत्वाचा ठरला असता पण ते ओळख उघड होत नसल्याने शक्य झाले नाही. नाहीतर सध्याच्या घराच्या परिस्थितीत नवरा-बायकोच्या समजुतीत काय फरक आहे याचे चांगले विश्लेषण करणे शक्य झाले असते आणि उपयोगाचेही ठरले असते.

### ३.१ कौटुंबिक हिंसा

लॉकडाऊनच्या काळात अत्यावश्यक सेवा वगळता सर्व माणसे चोवीस तास घरातच होती. सर्व्हे सुरु करण्याच्या वेळी स्त्रियांवरील हिंसाचारात वाढ झाल्याचं वार्तांकन होतं. याबरोबरच हेही वाचनात येत होतं की अशा घरातच अडकलेल्या परिस्थितीत; विशेषतः नवरे किंवा इतर पुरुष माणसं घरात असतांना स्त्रियांना मदतीसाठी फोन सुद्धा करता येत नाही, त्यांच्यावर लक्ष ठेवणारे डोळे सतत घरातच असतात. समाजाच्या काही स्तरांमध्ये ही परिस्थिती आहे याचा स्त्रियांसाठीच्या पोलीस हेल्पलाईन किंवा इतर मदत देणाऱ्या ज्या संस्था लॉकडाऊनच्या काळात काम करत होत्या त्यांना पडताळा आला. या सर्व्हेत सहभागी स्त्रियांपैकी ७७% जणींनी हिंसा होत नसल्याचे सांगितले आहे. १०% स्त्रियांनी शारीरिक, मानसिक, आर्थिक वा लैंगिक हिंसा होत असल्याचे नोंदवले आहे. **१०% स्त्रियांनी हे उत्तर रिकामे सोडले आहे** तर ३% स्त्रियांची उत्तरे अन्य या गटात मोडतात. ज्या सामाजिक स्तरातून सर्व्हेला प्रतिसाद आला आहे त्याकडे बघता आर्थिक दृष्ट्या वरच्या स्तरात हिंसेचं प्रमाण कमी आहे आणि लॉकडाऊनच्या काळात ते वाढलं नाही असा सावध निष्कर्ष काढता येतो. तरीही हे प्रमाण थोडं जास्त असण्याची शक्यता आम्हाला स्पष्ट दिसते कारण कशाकशाला हिंसा म्हणायचं याची पुरेशी स्पष्टता समाजात नसते. फक्त शारीरिक मारहाण हीच प्रामुख्याने हिंसा मानली जाते. जसं लैंगिक छळाच्या व्याख्येत शब्दाच्या, चित्रांच्या, विनोदाच्या माध्यमातून त्रास देणे, टक लावून पाहत राहणे यासारख्या गोष्टीही मोडतात तसंच घरात घडणाऱ्या हिंसेचं आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येत शारीरिक, मानसिक/भावनिक, आर्थिक हिंसाचारही येतो; त्यानुसार संबंधित प्रश्नांच्या उत्तराचे पर्याय दिले होते. १४ जणींची उत्तरे पुढील वर्गवारीत मोडणारी आहेत;

- ‘मानसिक छळ, हिंसा होत नाही.’
- ‘पुरेसे पैसे देत नाही, हिंसा होत नाही.’
- ‘शिवीगाळ-सतत टोमणे, हिंसा होत नाही’
- ‘फोन-इंटरनेट वापरु देत नाहीत, हिंसा होत नाही’.

म्हणजे सुमारे तीन टक्के (४९१ पैकी १४) स्त्रियांना वाटत नसलं तरी त्यांच्याबाबतीत हिंसा होते आहे. तुमच्यावर घरात हिंसा होते आहे का याचे उत्तर ३० स्त्रियांनी (सुमारे ६%) रिकामे सोडले आहे.

- टाळेबंदीच्या काळात त्यांच्याबाबतीत हिंसेत वाढ झाल्याचं ५% स्त्रिया नोंदवतात तर ५% स्त्रियांनी ‘सांगता येत नाही’ असे म्हटले आहे.
- एकल स्त्रियांपैकी ७% स्त्रियांनी लॉकडाऊनच्या काळात हिंसेत वाढ झाल्याचे सांगितले आहे. या प्रश्नाचे उत्तरही ३० स्त्रियांनी (सुमारे ६%) रिकामे सोडले आहे.

**हिंसेच्या बाबतीत स्त्रियांचे न बोलणे हे पुरेसे बोलके आहे का असे वाटल्यावाचून राहत नाही.**

**३.२ लॉकडाऊनमुळे लिंगभाव नात्यांवरचा, भूमिकांवरचा परिणाम -** या प्रश्नावलीचा एक महत्वाचा उद्देश म्हणून आम्ही नात्यांवरचा परिणाम तपासला. एकीकडे जगभरातून वाढत्या कौटुंबिक हिंसाचाराच्या बातम्या येत आहेत तर दुसरीकडे सोशल मिडीयावर काही सकारात्मक गोष्टीही लोक लिहित आहेत. सतत चोवीस तास, अनेक दिवस अचानक एकत्र राहायला लागणे, आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम होणे या सगळयाचा एकत्रित परिणाम काय असेल याचा फारसा कोणालाच अंदाज नव्हता. सर्वसाधारणपणे नातेसंबंध, विशेषतः लिंगभाव भूमिका बदलतील अशी एक अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात ते संपूर्णपणे खरे नाही असं आमचा सर्व्हे सांगतो.

- **कुटुंबातील स्त्री-पुरुषांच्या कामाच्या विभागणीत/वाटणीत झालेले बदल -** पितृसत्ताक समाजाने स्त्रिया आणि पुरुषांच्या कामांची विभागणी केली आहे. घरकाम, स्वयंपाक ही स्त्रियांची कामे तर बाहेरुन कमवून आणणे हे पुरुषाचे काम पितृसत्ताक समाज मानतो. आता स्त्रियांनी त्यांच्या पारंपारिक भूमिकांबरोबर नवीन भूमिकाही पेलल्याचे दिसत आहे, जसे की मोठ्या

जबाबदारीच्या नोकऱ्या, पुरुषांच्या समजल्या जाणाऱ्या क्षेत्रात काम उदा. वैमानिक, शास्त्रज्ञ, इंजिन ड्रायव्हर आणि असे अनेक व्यवसाय. मात्र पुरुषांच्या बाबतीत त्यांनी घरकाम जबाबदारी म्हणून स्वीकारले आहे असे काही अपवाद सोडले तर साधारणपणे दिसत नाही. लॉकडाऊनसारख्या अपवादात्मक परिस्थितीमुळे नेहमीपेक्षा थोडा जास्त मोकळा वेळ माणसांना मिळाला. पण त्याबरोबरच मध्यमवर्गीय/उच्चमध्यमवर्गीय घरात मदतनीस येऊ शकत नव्हते. अशा वेळी कुटुंबातल्या पुरुषांनी घरकामात काय आणि किती वाटा उचलला आहे ते आम्ही तपासले. तसेच काही बदल झाले असल्यास ते टिकतील किंवा कसे याबद्दलही आम्ही स्त्री-पुरुषांना प्रश्न विचारले.

**स्वयंपाकघरातील कामात आणि इतर घरकामात पुरुषांचा वाटा याबाबत स्त्रियांची उत्तरे पुढीलप्रमाणे मिळाली.**

| उत्तर | स्वयंपाकघरातील कामात पती/जोडीदाराचा वाटा | | इतर घरकामात पती/जोडीदाराचा वाटा | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| काहीही काम करत नाही/ नाहीत. | 105 | 18.36 | 49 | 8.57 |
| एक काम | 70 | 12.24 | 53 | 9.27 |
| दोन कामे | 49 | 8.57 | 65 | 11.36 |
| तीन कामे | 51 | 8.92 | 69 | 12.06 |
| चार कामे | 59 | 10.31 | 57 | 9.97 |
| पाच कामे | 33 | 5.77 | 50 | 8.74 |
| सहा कामे | 25 | 4.37 | 37 | 6.47 |
| सात कामे | 24 | 4.20 | 25 | 4.37 |
| आठ कामे | 16 | 2.80 | 16 | 2.80 |
| नऊ कामे | 6 | 1.05 | 11 | 1.92 |
| दहा/दहापेक्षा जास्त कामे | 39 | 6.82 | 21 | 3.67 |
| अन्य | 2 | 0.35 | 21 | 3.67 |
| उत्तर दिले नाही | 93 | 16.26 | 98 | 17.13 |
| **एकूण** | **572** | **100** | **572** | **100** |

- स्वयंपाक घरातील कामाबाबत १९% स्त्रियांनी त्यांचे पती/जोडीदार काहीही काम करत नसल्याचं सांगितलं.

- ५०% स्त्रिया म्हणतात की टाळेबंदीच्या काळात स्वयंपाकघरातील पाच ते सहा कामे त्यांचे जोडीदार करु लागले आहेत. उदा. चहा/कॉफी सरबत बनवणे, ओटा साफ करणे, धुतलेली भांडी जागेवर ठेवणे, कुकर लावणे इत्यादि.
- २०% स्त्रियांनी त्यांचे जोडीदार नाश्ता बनवणे, भाजी निवडणे/चिरणे, वाटण करुन देणे, भाजी/आमटी/पोळी/भाकरी करणे, दूध तापवणे, दही लावणे यासारखी कामे करु लागल्याचे सांगितले.
- १५ पुरुषांनी स्वयंपाकघरात नेहमीच मदत करतो असे म्हटले आहे तर १९८ पुरुषांनी स्वयंपाकघरात प्रथमच करु लागलेली कामे सांगितली आहेत.
- २०५ पुरुषांनी (६३%) घरात स्त्रियांना सतत किती काम करावं लागतं याची जाणीव झाल्याचे सांगितले.
- सतत घरात असल्याने पुरुषांनी या कामात काही प्रमाणात वाटा उचलल्याचं दिसत आहे. **ही कामे पुरुष नंतरही नेहमी करतील का या प्रश्नावर ५५% पुरुषांनी नेहमी करु असं म्हटलं असलं तरी केवळ २२% स्त्रियांनी आपले जोडीदार ही कामे नेहमी करतील असं नोंदवलं आहे.**
- स्वयंपाकातील प्रत्यक्ष कामापेक्षा बाहेरुन सामान आणून देणे, घरची साफसफाई ही कामे पुरुष प्रामुख्याने करत असल्याचं स्त्रियांनी म्हटलं आहे. आताच नाही तर पहिल्यापासून नवरा/जोडीदार घरात कामे करत असल्याचं बारा जणींनी सांगितलं आहे.

**या प्रश्नामध्ये अन्य या पर्यायात स्त्रियांनी लिहिलेली काही उत्तरे आम्हाला लक्षवेधी वाटली. त्यांच्याच शब्दातली ही उत्तरे:**

- As per his mood, he is doing one work, once in a 3/4 days. Otherwise he is upset all the time.
- Sometimes My husband helps me, but only sometime. 😒
- काहीही नाही, फक्त एक दोन वेळा केक बनवला य ट्युब ला पाहून
- सगळ्या कामात मदत करतात.

### ३.३ लॉकडाऊन स्थितीचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम

घरात २४ तास सर्वजण सतत एकत्र असल्याचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम स्त्री-पुरुषांना काय वाटतात याचा आम्ही शोध घेतला.

| **लॉकडाऊनमुळे घरातील सर्व सदस्य घरीच एकत्र असण्याचे परिणाम कसे वाटत आहेत?** | | | | |
|---|---|---|---|---|
| **उत्तर** | **स्त्रिया** | | **पुरुष** | |
| | **संख्या** | **%** | **संख्या** | **%** |
| चांगले (सकारात्मक) | 250 | 43.71 | 189 | 58.33 |
| नकोसे (नकारात्मक) | 12 | 2.10 | 13 | 4.01 |
| थोडे चांगले -थोडे वाईट | 228 | 39.86 | 89 | 27.47 |
| उत्तर दिले नाही | 82 | 14.34 | 33 | 10.19 |
| **एकूण** | **572** | **100.00** | **324** | **100.00** |

**स्त्रियांची उत्तरे -** लॉकडाऊनचा परिणाम सकारात्मक आहे असे उत्तर देणाऱ्या गटाचा आम्ही आणखी खोलात जाऊन अभ्यास केला. सकारात्मक परिणामांचे पुढील पर्याय आम्ही दिले होते; घरच्यांबरोबर हवा तसा वेळ मिळतो, मुलांना वेळ देता येतो, वेळेअभावी करता येत नव्हते असे छंद पुरे करता आले, मदतनीसांमुळे (घरकाम करणाऱ्या महिला) कामाचा बोजा हलका होतो हे कळले.

- एकूणांपैकी केवळ सुमारे ४४% स्त्रियांनी लॉकडाऊनचे परिणाम सकारात्मक होते हा पर्याय निवडला. अशा अडीचशे पैकी सुमारे ५७% स्त्रियांनी एकाही नकारात्मक परिणामाचा उल्लेख केला नाही. यापलीकडे जाऊन अनेकांनी उत्तरे दिली. जवळजवळ ५०% स्त्रियांनी छंद पुरे करता आले असं म्हटलं आहे. रोजच्या कामाच्या धबडग्यात स्त्रिया नोकरी/ व्यवसाय करत असोत वा नसोत घरकामाचा खूप बोजा त्यांच्यावरच असतो. त्यामुळे अनेक स्त्रियांना आपले छंद बासनात गुंडाळून ठेवत आयुष्य जगायला लागतं असं हा सर्व्हे दाखवून देतो.
- एक खास पावती घरकामगार स्त्रियांना मिळाली आहे. एरवी अनेकदा त्यांना आणि त्यांच्या कामाला पुरेसं महत्व दिलं जात नाही, त्यांच्याविषयी पुष्कळ तक्रारीही ऐकायला येतात. लॉकडाऊनचा काळ जसा वाढत गेला तशा त्यांना पूर्ण पगार न देणाऱ्या मालक-

मालकिणींविषयीची तक्रार कानावर येऊ लागली होती. पण या सर्व्हेच्या चांगल्या परिणामात घरकामगार स्त्रियांचे महत्व अनेकींनी मान्य केले. लॉकडाऊनचे परिणाम चांगले होते असं मानणाऱ्या २५० स्त्रियांपैकी सुमारे ९० (३६%) जणींनी अशा मदतनीसांमुळे घरकामाचा बोजा हलका होतो हे म्हटले आहे.

- **सकारात्मक परिणाम – अन्य लक्षवेधी उत्तरे (स्त्रिया) त्यांच्याच शब्दात :**
    - मला स्वतःसाठी वेळ देता येतोय.
    - जोडीदाराची कायम सोबत असल्याची जाणीव खूप आधार देऊन जाते, मग कसलाही कंटाळा येत नाही आणि थकवा निघून जातो.
    - एकमेकामध्ये वैचारिक देवाणघेवाण होते, व्यायाम करायला वेळ देता येतो.
    - शेजारी गॅलरीतून संवाद साधला जातो.
    - लेखन करायला स्वास्थ्य मिळाले.
    - आपण एकमेकांना सांभाळून घेतोय हे पाहून बरे वाटते. मुलगा हॉस्टेल वर असतो एरवी. तो घरात आहे ह्यासारखा आनंद नाही.
    - घरकामात वेळ जातो. स्वयंसिध्द असल्यामुळे समाधान  वाटते.

- **नकारात्मक परिणाम -** अनेक स्त्रियांनी नकारात्मक परिणामांची छोटीमोठी यादी दिली आहे, त्यामध्ये दोन कारणं प्रामुख्याने आढळतात. स्वयंपाकाच्या कामात फार वेळ जातो ही तक्रार यातल्या ३५% स्त्रियांनी नोंदवली आहे तर आर्थिक ताण हे कारण २०% स्त्रियांनी नोंदवलं आहे. लॉकडाऊनचे परिणाम केवळ नकारात्मक आहेत असं म्हणणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी आहे आणि त्यातही आर्थिक ताण हे महत्वाचं कारण दिसतं. छोट्या घरात सगळी माणसं २४ तास घरातच असली तर जागा कमी पडते आणि TV वरून वाद होत राहतात असंही दिसलं. लॉकडाऊनमुळे ताण वाढले तरी त्याचं पर्यवसान चिडचिड, भांडणं आणि मारहाण यात झाल्याचं अगदी कमी प्रमाणात निदर्शनास आलं.

- **नकारात्मक परिणाम – अन्य लक्षवेधी उत्तरे (स्त्रिया) त्यांच्याच शब्दात :**
    - I miss personal space - कधी कधी बाहेर जाऊन फिरावे वाटत एकटीला, देवळात जावं वाटतं, आणि विशेषतः मैत्रिणींना भेटावं वाटतं - miss करते मी. ग्राउंड वरचे exercise - एक तास माझा!
    - मुलांना बाहेर मोकळे खेळता येत नसल्यामुळे घरातच त्यांची चिडचिड भूणभूण होते, पर्यायाने आपली पण चिडचिड होते त्यांच्यावर आणि वातावरण बिघडतं घरातलं. सगळयांची मनस्थिती खराब होते.
    - सतत किचनमध्ये व इतर कामे करत राहिल्यामुळे कंबरदुखी, पाठदुखी, टाचदुखी होत आहे.
    - सासू सासरे बोलत नाहीत, आणि नवऱ्याला माझ्याशी बोलण्यात इंटरेस्ट नसतो. जेवण पण एकाच वेळेला करते मी. कारण सासू सासरे जेवणावरून पण बोलतात सतत.

- **पुरुषांची उत्तरे -** एकूणपैकी १८९ पुरुषांनी म्हणजे सुमारे ५८% पुरुषांनी लॉकडाऊनचा परिणाम चांगला झाला असं म्हटलं आहे. स्त्रियांच्या तुलनेत हे प्रमाण जास्त आहे. या १८९ पैकी सुमारे ७०% पुरुषांनी लॉकडाऊनमुळे काहीच नकारात्मक परिणाम झाला नसल्याचे नोंदवले आहे.

- पुरुषांच्या प्रश्नावलीत, सकारात्मक परिणामात वर दिलेल्या पर्यायांच्या यादीत आणखी एकाची भर आम्ही घातली होती. अनेक पुरुष बाईचं घरातलं काम गृहीत धरतात आणि त्याचं महत्व, आर्थिक फायदा विचारात घेत नाहीत असे सर्वसाधारणपणे दिसते. या पार्श्वभूमीवर 'घरातली बाई किती सातत्याने कामे करीत असते हे कळले' असा एक पर्याय दिला होता. १८९ पैकी ५२% पुरुषांनी या प्रश्नाचं होकारार्थी उत्तर दिलं आहे. लॉकडाऊनमुळे स्त्रीच्या या कामाची जाणीव जास्त पुरुषांना झाली तर तो समाजावरचा एक चांगला परिणाम आहे असंच मानायला हवं.

- तसंच ३५% पुरुषांनी मदतनीसांमुळे पतीचा/ मैत्रिणीचा घरकामाचा बोजा कमी होतो असंही म्हटलं आहे.

- स्त्रियांप्रमाणे ४७% पुरुषांनी लॉकडाउनमुळे छंद जोपासायची संधी मिळाल्याचं नोंदवलं आहे. घरातली जागा कमी पडणे, TV पाहण्यावरून वाद होणे या गोष्टी पुरुषही आपल्या अनुभवात म्हणतात.
- लॉकडाऊनचे परिणाम सकारात्मक झाले हे मान्य करतानाच सुमारे २३% पुरुषांनी आर्थिक ताण ही अडचण नोंदवली आहे आणि स्त्रियांच्या तुलनेत हे प्रमाण जास्त आहे.
- **सकारात्मक परिणाम – अन्य लक्षवेधी उत्तरे (पुरुष) त्यांच्याच शब्दात :**
  - संवाद वाढला. मतभेद समोर आले व त्यामुळे स्वतःवर काम करण्याची संधी मिळाली. To understand wife emotions in her different roles.
  - माझे काम सतत फिरतीचे असल्यामूळे बायकोला एकटेपणा जाणवत असे. Lockdown मुळे एकटेपणा नाहीसा झाला.
  - माझी मुलगी, मी आणि मिसेस घरकाम मिळून करतो त्यामुळे कोणावर ताण नाही. लिंगभेद नाही. हे पुरुषाचे, हे स्त्रीचे असे नाही. सगळ्यांनी घर आपले आहे त्यामुळे सगळे मिळून केलं पाहिजे. बाईचं काम आहे आपण मदत करतो या विचार नाही.
  - पत्नी व मुलांबद्दल काही बाबतीत नव्याने ओळख झाली.
  - आपले कोण? खरे जिवलग मित्र नातेवाईक कोण? माणूस आणि निसर्ग यांच्यातील भावबंध जुळले.
  - घरकाम करताना आवडतं आहे. मिळून कामं केली की एकट्यावर भारी पडत नाही. सामंजस्याने कामं केली तर चिडचिड होत नाही.
  - आपण आपल्या बऱ्याच गरजा किती कमी करू शकतो हे कळले.
- **नकारात्मक परिणाम – अन्य लक्षवेधी उत्तरे (पुरुष) त्यांच्याच शब्दात :**
  - परिवाराच्या तब्येतीची काळजी वाटते.
  - No differentiation between office hours and personal time
  - सतत इतका वेळ एकत्र असायची सवय नव्हती.
  - Mental health issues

**३.४ जोडीदाराबरोबरचे नाते** – एरवी जोडीदाराशी नाते कसे आहे आणि लॉकडाऊन काळात सतत एकत्र असण्याचा काय परिणाम वाटतोय असे प्रश्न स्त्री-पुरुष दोघांना विचारले होते.

| **प्रश्न - तुमचे जोडीदाराबरोबरचे नाते एरवी कसे आहे ?** | | | | |
|---|---|---|---|---|
| **उत्तर** | **स्त्रिया** | | **पुरुष** | |
| | **संख्या** | **%** | **संख्या** | **%** |
| चांगले- संवादाचे | 336 | 58.74 | 239 | 73.77 |
| तणावपूर्ण-धाकाचे | 35 | 6.12 | 16 | 4.94 |
| कधी कधी तणावाचे | 5 | 0.87 | 4 | 1.23 |
| ठीक ठाक | 4 | 0.70 | - | - |
| सांगता येत नाही | 75 | 13.11 | 27 | 8.33 |
| अन्य | 17 | 2.97 | 4 | 1.23 |
| उत्तर दिले नाही | 100 | 17.48 | 34 | 10.49 |
| **एकूण** | **572** | **100.00** | **324** | **100.00** |

- सुमारे ५९% स्त्रिया आणि ७४% पुरुषांनी आपलं नातं चांगलं संवादाचं असल्याचं म्हटलं आहे.
- १३% स्त्रिया आणि ८% पुरुषांना आपलं नातं कसं आहे हे सांगता येत नसल्याचं म्हटलं आहे.
- **या प्रश्नावरची स्त्रियांची अन्य उत्तरे पुढीलप्रमाणे त्यांच्याच शब्दात :**
    - We are not friends. We are husband and wife.
    - समांतर रेघ
    - नाते त्याच्या मूडनुसार बदलते.
    - Its a sexless marriage since 12 years.
    - गरजेपुरता संवाद
- **याच प्रश्नावरची पुरुषांची अन्य उत्तरे पुढीलप्रमाणे त्यांच्याच शब्दात :**
    - खट्टे जादा मीठे कम
    - नरम गरम
    - भांडा पण नांदा
    - मी तिचा नेहमीच सखा, प्रियकर, दोस्त, कवी कधीकधी बापही पण ती मात्र?

## ४. समारोप

नारी समता मंच ही संस्था गेली ३३ वर्ष स्त्रियांवरील अत्याचारांच्या निराकरणासाठी प्रयत्न करीत आहे. शारीरिक आणि मानसिक दोन्ही प्रकारच्या अत्याचारांना स्त्रियांना तोंड द्यावं लागतं आणि त्या समस्या सोडवण्यासाठी मंच कार्यरत आहे. या पार्श्वभूमीवर टाळेबंदीत दीर्घकाळ कुटुंबातील सर्वांना २४ तास एकत्र राहायला लागत असल्यामुळे स्त्रियांना असुरक्षित परिस्थितीत घरात राहावं लागत असेल का हा प्रश्न मनात आला होता. कोविड-१९ या महामारीचा काळ हा आपल्या सर्वांसाठीच अभूतपूर्व अनुभवाचा आहे. माणसं अशा काळात कशी वागतील याचे आडाखेही करणं अवघड होतं. कठीण प्रसंग आले की अनेकदा माणसांमधली वाईट वृत्ती डोकं वर काढतांना दिसते. अशी काहीशी अपेक्षा आमच्याही मनात होती. स्त्रियांवरील हिंसेच्या जास्त घटना या सर्वेक्षणातून सामोऱ्या आल्या असत्या तर आम्हाला आश्चर्य वाटलं नसतं, वाईट वाटलं तरी! पण कधी अनपेक्षित निकाल हाती आले तर त्याचा आनंद वाटावा अशी थोडीशी आमची परिस्थिती झाली आहे. ऑनलाईन सर्वेक्षणाच्या मर्यादा लक्षात घेऊनही आम्हाला असं वाटलं की हिंसा किंवा नकारात्मक परिणामांच्या  तुलनेत सकारात्मक परिणाम झाले असं सांगणाऱ्या स्त्री-पुरुषांची संख्या जास्त आढळली. या अभ्यासातून दिसलेल्या संक्षिप्त बाबी पुढीलप्रमाणे;

**नकारात्मक**

- लिंगभाव भूमिका आणि कामाची विभागणी यात स्त्रियांनी पेललेल्या नवीन भूमिका हा मोठा बदल मात्र पुरुषांनी त्या प्रमाणात घरकामाची जबाबदारी घेतलेली दिसत नाही.
- या सर्वेक्षणात भाग घेतलेल्या अनेक स्त्रिया स्वतः नोकरी-व्यवसाय करणाऱ्या आणि बऱ्या/ चांगल्या आर्थिक स्थितीतल्या असल्यामुळे त्या रोजच्या आयुष्यात घरकामाला कुणाची मदत असणाऱ्या गटात मोडतात. त्यांच्यापैकी कित्येकींनी लॉकडाऊन मध्ये सगळे घरात असल्याने स्वयंपाकघरात खूप वेळ जातो ही तक्रार मांडली.
- आता करत असलेली कामे पुरुष कायमस्वरूपी करतील का याची खात्री नाही.
- **१०% स्त्रियांनी हिंसा होत असल्याचे लिहिले आहे**, प्रमाण हे त्यापेक्षा जास्त असण्याची दाट शक्यता आहे कारण अजून १०% स्त्रियांनी याचे उत्तर रिकामे सोडले आहे आणि ३% स्त्रियांना वाटत नसलं तरी त्यांच्याबाबतीत हिंसा होते आहे. त्यामुळे हा निश्चितच मोठा काळजीचा मुद्दा आहे.

- आर्थिक ताण हा मुद्दा १/३ पुरुषांनी आणि १/५ स्त्रियांनी लिहिला आहे. याचे स्वरुप गंभीर असू शकते.

**सकारात्मक -**

- घरच्या बाईला सतत किती काम करावे लागते याची जाणीव
- घरकामगार महिलांच्या कामाची जाणीव
- काही प्रमाणात पुरुषांनी घरकामात उचललेला वाटा

एरव्ही घरातल्या बाईला गृहीत धरणाऱ्या पुरुषांना बाईचा घरकामात किती वेळ जातो आणि त्याची आवड किंवा उत्साह नसेल तर ते किती कंटाळवाणं पण अत्यावश्यक काम आहे याची जाणीव होणं, घरातली कामं - स्वयंपाकासकट - वाटून घेतली गेली तर स्त्री-पुरुषातलं नातं जास्त संपन्न होतं हे मान्य करणं या गोष्टी समोर आल्या. अनेक स्त्रियांच्या प्रतिक्रियाही घरात जास्त सुसंवाद निर्माण झाला असं दर्शविणाऱ्या आहेत. पुरुषांनी घरातल्या कामाला हातभार लावला याची सकारात्मक नोंद घेणाऱ्या आहेत.

जी कामं स्त्रिया पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव म्हणून करतात त्यात त्यांना आनंद आणि समाधान असतं असं  मानणारा पुरुषवर्ग असतो. त्यांना या सर्वेक्षणातून असं स्पष्ट दिसून येईल की परंपरा म्हणून स्त्रिया घरकाम, स्वयंपाक, आजारी माणसांची सेवा, घरातल्या माणसांची सेवा असं करत असल्या तरी त्यात आवडीचा भाग कमी आणि जबाबदारीचा भाग जास्त असं असू शकतं. या काळात काही पुरुषांनाही स्वयंपाक करण्यात आनंद असू शकतो हे लक्षात आलं. एकूणच सध्याच्या अभूतपूर्व परिस्थितीमुळे चाकोरीबाहेरचे अनुभव घेता आले, नेहमीपेक्षा निराळ्या कामातही आनंद असू शकतो आणि पारंपारिक कामात कंटाळा असू शकतो या दोन्ही प्रकारच्या जाणीवा समाजातल्या काही घटकांना झाल्या हे या सर्वेक्षणात दिसून आलं. कोविड-१९ मुळे अनेक वाईट गोष्टींना सामोरं जायला लागलं असलं तरी समाजबदलाच्या दृष्टीनं, स्त्री-पुरुष समतेच्या दृष्टीनं एक पाऊल हलकेच पुढे पडते आहे असा विश्वास या सर्वेक्षणामुळे आम्हाला मिळाला आहे. वाईटातून काही बरं निघतं ते असं!